# छत्रपती संभाजीनगर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,छत्रपती संभाजीनगर
## (म्हाडा प्रादेशिक घटक)

**अनिवासी भूखंडाचा (Commercial and Aminity Plots) ई- लिलावाव्दारे विक्रीकरीता निमंत्रण**

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणातर्फे (म्हाडा),छत्रपती संभाजीनगर मंडळाच्या अखत्यारितील असलेल्या अनिवासी भुखंडाच्या विक्रीसाठी मुख्य अधिकारी,छत्रपती संभाजीनगर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ ई-लिलाव प्रक्रिया राबवीत आहेत. या अनिवासी भुखंडाचे विक्री व वितरण महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम १९७६, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (मिळकत व्यवस्थापन, विक्री, हस्तांतरण आणि अदलाबदल ) विनियम १९८१ - III A आणि (महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास सदनिकेचे वाटप नियम १९८२ ) मधील तरतूदीनुसार करण्यात येईल.

**<u>ऑनलाईन अर्ज भरण्यापूर्वी अर्जदारांनी माहिती पुस्तिका काळजीपूर्वक वाचावी.</u>**

छत्रपती संभाजीनगर मंडळाच्या अनिवासी भूखंडांच्या विक्रीसाठी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (जमिनीचे वाटप) नियम १९८१ मधील भाग III-b च्या तरतुदीनुसार व महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (मिळकत व्यवस्थापन, विक्री, हस्तांतरण व गाळ्याची अदलाबदल) विनियम १९८१ III-A यामधील तरतुदी अनुसार व त्या त्या वेळी, त्या त्या अवस्थाप्रत लागू केल्या जाणाऱ्या तरतूदी व महाराष्ट्र शासनाच्या ई-लिलाव अधिसूचनेस अधीन राहून इच्छुक लिलाव धारकांकडून ई-लिलावामार्फत ऑनलाईन बोली पध्दतीने छत्रपती संभाजीनगर,जालना,धाराशिव,नांदेड,लातूर,परभणी या जिल्हयातील विविध व्यावसायिक आरक्षणासाठी राखीव असलेल्या ५३ अनिवासी भूखंडाच्या विक्रीकरीता अर्ज मागविण्यात येत आहेत. [महाराष्ट्र शासनाच्या ई-लिलाव अधिसूचनेच्या अटी व शर्ती जशाच्या तशा व संपूर्णपणे (वेळोवेळी होणा-या सुधारणेसह) लागू राहतील]

## अनिवासी भूखंडाचा ई-लिलाव जुन-२०२५ संबंधी वेळापत्रक

| अ.क्र. | प्रक्रिया | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १ | ई-लिलाव जाहिरात वृत्तपत्रात प्रसिध्द करणे | ०१.०६.२०२५ | |
| २ | ई-लिलाव प्रक्रियेत भाग घेण्यासाठी संकेत स्थळावर नोंदणी करणे, ऑनलाईन अर्ज करणे, कागदपत्रे अपलोड करणे, अनामत रक्कम भरणे, इत्यादीकरीता सुरुवात दिनांक व वेळ | ०२.०६.२०२५ | दुपारी १२.०० वा. |
| ३ | ई-लिलाव प्रक्रियेत भाग घेण्यासाठी संकेतस्थळावर नोंदणी करणे, ऑनलाईन अर्ज करणे, कागदपत्रे अपलोड करणे, अनामत रक्कम भरणे, इत्यादीकरीता अंतिम दिनांक व वेळ | ०१.०७.२०२५ | रात्री ११.५९ पर्यंत |
| ४ | ई -लिलावाकरिता RTGS/NEFT व्दारे अनामत रक्कम भरण्याचा अंतिम दिनांक | ०२.०७.२०२५ | संबंधित बँकेच्या कार्यालयीन वेळेपर्यंत |
| ४ | ई लिलाव (ऑनलाईन बोली) सुरु होण्याची दिनांक व वेळ | दि.०७.०७.२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता | |
| ५ | ई लिलाव (ऑनलाईन बोली) करीता अंतिम दिनांक व वेळ | दि.०७.०७.२०२५ रोजी दुपारी ०५.०० वाजेपर्यंत | |
| ६ | ई लिलावचा एकत्रित निकाल जाहीर करण्याचा दिनांक | दि.०८.०७.२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता. | |

**१) पात्रता निकष :**

१.१) १८ वर्षापेक्षा कमी वयाची व्यक्ती ई-लिलावामध्ये सहभागी होऊ शकत नाही. ई-लिलावामध्ये सहभागी झालेल्या व्यक्तीने स्वत:चे वय १८ वर्षापेक्षा जास्त आहे हे सिध्द करण्यासाठी आधारकार्ड व पॅनकार्ड सादर करणे आवश्यक आहे.

१.२) अर्जदार हा महाराष्ट्राचा रहिवासी असणे बंधनकारक आहे. करिता अर्जदारास महाराष्ट्र राज्यातील वास्तव्याचे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) सन २०१९ नंतरचे सादर करणे आवश्यक आहे.

१.३) ई-लिलावामध्ये सहभागी झालेली व्यक्ती योजना संकेतामधील अशा सर्व योजनेसाठी अर्ज दाखल करु शकतो. प्रत्येक योजनेकरिता स्वतंत्र अर्ज करावे लागतील व प्रत्येक अर्जासोबत स्वतंत्र अनामत रकमेसह ई-लिलावामध्ये सहभागी होण्यासाठीचे अर्ज शुल्क, प्रक्रिया शुल्काचा भरणा Net Banking, Credit Card, Debit Card, व्दारे Online Payment करु शकतात तसेच RTGS/NEFT मार्फत भरणा करु शकतात. मात्र एका योजना संकेतामध्ये एकापेक्षा अधिक अर्ज करता येणार नाहीत. एकाच संकेतामध्ये एकापेक्षा अधिक अर्ज केल्याचे आढळल्यास त्या अर्जदाराचे असे सर्व अर्ज कोणतेही कारण न देता रद्द करण्यात येतील.

१.४) ई-लिलावामध्ये सहभागी होणारी कंपनी अथवा सहकारी संस्था असल्यास पात्रतेसाठी नोंदणी प्रमाणपत्र तसेच कंपनीचे पत्र किंवा सहकारी संस्थेचा ठराव जोडणे बंधनकारक राहील. [ई-लिलावामध्ये बोली लावणे व इतर संबंधीत कामासाठी चेअरमन/सेक्रेटरी यांना प्राधिकृत / नियुक्त केल्याबाबतचा व चेअरमन / सेक्रेटरीचा फोटो,पॅन कार्ड, ई-मेल आयडी व मोबाईल नंबर वापरणेबाबतचा ठराव देणे बंधनकारक राहील.]

**२) अनिवासी भूखंडाच्या संगणकीकृत ई-लिलाव अर्ज सादर करण्याची कार्यपध्दती :-**

२.१) ई-लिलावासाठी म्हाडा संकेतस्थळ www.eauction.mhada.gov.in व www.mhada.gov.in यावर अर्जदाराने सर्वप्रथम स्वत:ची नाव नोंदणी करावी व सर्व माहिती काळजीपुर्वक भरावी.

**ई-लिलावा करीता खालील प्रमाणे अर्ज करावा.**

**टप्पा १ :** म्हाडाच्या वेबसाईटवर स्वत:ची नोंदणी करा. (www.eaution.mhada.gov.in)

**टप्पा २ :** ओटीपी व्दारे तुमचा ईमेल आयडी आणि मोबाईल नंबर सत्यापित करा.

**टप्पा ३ :** तुमच्या वापरकर्ता क्रेडेन्शियल्ससह लॉगीन करा आणि सुरक्षित लॉगीनसाठी ओटीपी सत्यापित करा.

**टप्पा ४:** थेट डॅशबोर्डवरुन लिलाव निवडा.

**टप्पा ५:** ईएमडी पे बटणावर क्लिक करा जिथे तुम्हाला अर्ज करायचा आहे. (पर्याय तारीख आणि वेळेत सुरु होईल आणि समाप्त होईल)

**टप्पा ६:** नेट बँकींग, आरटीजीएस / एनईएफटी पर्यायांव्दारे ईएमडी भरा.

**टप्पा ७ :** ईएमडी यशस्वीरीत्या भरल्यानंतर प्रारंभीक बोली लावा. (टीप : हा वास्तविक बोली टप्पा नाही)

**टप्पा ८ :** त्यानंतर अर्जदार लिलाव बोलीसाठी सरळ पात्र ठरतील.

**टप्पा ९:** ईएमडी पेड डॅशबोर्ड लिलावा मधून लिलाव निवडा. ज्यांनी ईएमडी यशस्वीरित्या भरली आहे त्यांच्यासाठी वास्तविक बोली प्रक्रीया सुरु होते.

**टप्पा १०:** लिलाव परिणाम - वास्तविक लिलाव प्रक्रीया समाप्त झाल्यानंतर दुस-या दिवशी निकाल प्रदर्शित होईल.

**ई-लिलाव मध्ये सहभागी होणाऱ्या अर्जदाराने ऑनलाईन अर्ज करणेपूर्वी खालील माहिती सोबत ठेवावी म्हणजे अर्ज भरणे सुलभ होईल.**

- अर्जदाराचे आधारकार्ड.

- अर्जदाराचे पॅनकार्ड
- अर्जदाराचे महाराष्ट्रातील वास्तव्याचे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) (सन २०१९ नंतरचे)
- अर्जदाराचा आधारकार्डशी संलग्न (Linked) स्वत:चा भ्रमणध्वनी क्रमांक (Mobile No.) व ई- मेल आयडी.
- अर्जदाराच्या बँक खात्याचे तपशील.
- संस्थेने / कंपनीने अर्जदारास अधिकृत केल्याचे पत्र / ठराव व नोंदणी प्रमाणपत्र.

२.२) अर्जदाराने स्वत:च्या बचत / चालू / संयुक्त खात्याचा तपशिल जसे, बँकेचे नाव, शाखा व पत्ता, खाते क्रमांक, बँकेचा IFSC क्रमांक द्यावा. अर्जदारास दुसऱ्या व्यक्तीच्या बँक खात्याचा तपशिल देऊन अर्ज करता येणार नाही. असे केल्यास अर्ज अवैध ठरविण्यात येईल. तसेच एन.आर.आय. खात्याचा तपशिल चालणार नाही.

२.३) लिलावा दरम्यान अर्ज भरताना कंपनी अथवा सहकारी संस्था अर्जदार असल्यास त्यांनी कंपनी अथवा सहकारी संस्थेचा बचत / चालू / संयुक्त खात्याचा तपशील द्यावा. (वैयक्तिक सभासदाचा बँक खात्याचा तपशील ग्राह्य धरला जाणार नाही.)

२.४) यशस्वी लिलावधारकाने विहित वेळेमध्ये भुखंडाची रक्कम मंडळाकडे भरली नाही अथवा आपल्या देकारापासून माघार घेतली तर त्याची पूर्ण अनामत रक्कम (EMD) जप्त केली जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

२.५) देकार निर्गमित केल्यानंतर मा. मुख्य अधिकारी / छत्रपती संभाजीनगर मंडळ यांच्या स्विकारासाठी शेवटच्या रक्कम भरणा केलेल्या दिनांकापासून ९० दिवसांसाठी वैध असेल.

**२.६) अयशस्वी लिलावधारकांची अनामत रक्कम ही बोलीच्या अंतिम दिनांकापासून १५ दिवसांमध्ये परत करण्यात येईल. अर्जदारास अनामत रक्कमेचा परतावा अर्जदार ज्या खात्यातून किंवा ज्या पैसे देण्याच्या पध्दतीने (Payment Mode) अनामत रक्कम भरणा करणार आहे त्याच खात्यावर किंवा पैसे ज्या पध्दतीने मंडळास प्राप्त झालेले आहेत (way to source/back to source) परत करण्यात येणार आहे. याची अर्जदारांनी विशेष नोंद घ्यावी.**

२.७) ई-लिलाव प्रक्रियेत सहभागी होणेसाठी ऑनलाईन अर्जाची किंमत तसेच ई-लिलाव प्रक्रिया शुल्क रु.७,०८०/- विनापरतावा असेल.
[रु. ६०००/- + GST @१८% रु. १०८०/-]

३) **ई-लिलावासाठी अर्जदारास सर्व अनिवासी भुखंडासाठी अर्ज शुल्क व्यतिरीक्त प्रत्येकी अर्जनिहाय अनामत रक्कम (EMD AMOUNT) रु.५०,०००/- चा वेगळा भरणा करावा लागेल.**

४) यशस्वी लिलावधारक अपात्र ठरल्यास अथवा त्याने अर्ज मागे घेतल्यास अधिकतम अग्रक्रमानुसार द्वितीय लिलावधारकास प्रथम यशस्वी लिलावधारकाने लावलेल्या बोलीनुसार रक्कम भरण्याच्या अटीस अधीन राहून प्राधान्य देण्यात येईल. यशस्वी प्रथम व द्वितीय लिलावधारक हे दोन्ही लिलावधारक काही कारणास्तव बाद/अपात्र/रद्द ठरल्यास पुढील अग्रक्रमानुसार यशस्वी लिलावधारकाने बोली केलेला उच्चतम दर स्विकारण्याच्या अटीस अधीन राहून प्राधान्य देण्यात येईल. सदर प्रक्रियेस प्रतिसाद न मिळाल्यास त्या त्या संकेतातील अनिवासी भुखंडाचा ई-लिलाव नव्याने भविष्यात आयोजित करण्यात येईल.

५) सदर ई-लिलावामध्ये लिलावधारकांस संकेतस्थळावरील नमुद केलेल्या रक्कमेच्या पटीमध्ये बोली लावणे आवश्यक आहे.

६) सदर ई-लिलाव फक्त ०१ वर्ष वैध राहील.

७) लिलावधारक एका पेक्षा जास्त अनिवासी भुखंडासाठी अर्ज करु शकतो यासाठी आवश्यक ई-लिलाव शुल्क तसेच अनामत रक्कम वेगवेळी भरावी लागेल.

८) Help / Support करीता कृपया eauction.mhada.gov.in या वेबसाईट वर किंवा **www.mhada.gov.in** या संकेतस्थळावरील Lottery>Eauction>eauction portal ला भेट दयावी.

९) **अनिवासी भुखंडाच्या संगणकीकृत ई-लिलावाची कार्यपध्दती :**

९.१) जाहिरातीनुसार प्राप्त झालेल्या सर्व ऑनलाईन अर्जाची प्रथम ऑनलाईन पद्धतीने संगणकीय प्रणालीव्दारे पडताळणी करण्यात येईल. यात अर्जदाराने सादर केलेले सर्व कागदपत्रे तपासण्यात येतील. अपूर्ण / चुकीचे कागदपत्रे असलेले अर्ज नोंदणी प्रक्रीयेतून बाद करण्यात येतील. नोंदणी प्रक्रीया पूर्ण झालेल्या अर्जदारांना अनामत रक्कम, प्रक्रीया शुल्क व इतर शुल्क भरण्याची अनुमती देण्यात येईल. सदर प्रक्रीया पूर्ण झाल्यानंतर अर्जदार बोली प्रक्रीयेत सहभागी होऊ शकतात.

९.२) **खालील प्रकारचे अर्ज आढळल्यास असे सर्व अर्ज निविदेमधून बाद करण्यात येतील.**

- एकाच लिलावधारकाने एकाच संकेतामध्ये, एकाच प्रवर्गात एकापेक्षा जास्त अर्ज.
- वेगवेगळ्या निविदाकाराचे एकाच बँकेमध्ये एकच खाते क्रमांक.
- चुकीचा PAN / TAN क्रमांक आढळलेले अर्ज.

९.३) ई-लिलावात यशस्वी झालेल्या तसेच अधिकतम लिलावधारक यादीवरील अर्जदारांचे अर्जांचे क्रमांक म्हाडाच्या www.mhada.gov.in व www.eauction.mhada.gov.in या संकेत स्थळावर तसेच म्हाडाच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्द करण्यात येतील. ई-लिलावात यशस्वी झालेल्या लिलावधारकास म्हाडा मार्फत सुचनापत्राद्वारे स्वतंत्ररित्या कळविण्यात येईल.

ई-लिलावामध्ये अयशस्वी न्युनतम लिलावधारक यादीवरील अर्जदारांना त्यांनी अदा केलेली संपूर्ण अनामत रक्कम (विनाव्याज) Electronic Clearing System (E.C.S) / NEFT द्वारे अर्जदाराने अनामत रक्कम ज्या बँक खात्यातून भरणा केली त्या बँक खात्यात अदा करण्यात येईल.

**१०. ई-लिलावात यशस्वी झाल्यानंतर अर्जदाराने म्हाडाकडे दाखल करावयाच्या कागदपत्रांचा तपशील :**

यशस्वी व पात्र ठरलेल्या लिलावधारकांच्या कागदपत्रांची आवश्यकता असल्यास फेरतपासणी करण्याचे अधिकार मंडळास आहेत. यशस्वी लिलावधारकांना मागणी केलेल्या सर्व कागदपत्रांच्या मुळ प्रती सादर करणे आवश्यक आहे. कागदपत्रे चुकीचे आढळल्यास अथवा चुकीची माहिती सादर केलेली असल्यास याप्रकारच्या अर्जदारांवर म्हाडा विनियम १८ अन्वये कार्यवाही करुन अशा लिलावधारकाचे वितरण रद्द करण्यात येईल. त्यावर अर्जदारास १५ दिवसांच्या आत मा. उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी / प्राधिकरण यांचेकडे अपिल करता येईल व त्यांचा निर्णय अंतिम राहिल.

यशस्वी अर्जदाराने १० दिवसांचे आत त्यांची स्विकृती नोंदविणे आवश्यक आहे. सदर कालावधी स्विकृतीबाबत निर्णय न केल्यास त्यांचे वितरण रद्द करुन व्दितीय उच्चतम बोलीधारकास संधी देण्यात येईल व यासंदर्भात मंडळाचा निर्णय अंतिम असेल.

**११. अनिवासी भूखंडांची आधारभूत किंमत :**

अनिवासी भूखंडाची आधारभूत किंमत जाहिरातीमध्ये तात्पुरत्या स्वरूपात दर्शविली आहे. आधारभूत किंमत बदलण्याचा संपूर्ण अधिकार मुख्य अधिकारी / छत्रपती संभाजीनगर मंडळ यांनी राखून ठेवला आहे.

१२. **अनिवासी भूखंडाकरीता विक्री किंमत भरण्याची पध्दत :-**

यशस्वी लिलावधारकाची अंतिम पात्रता निश्चित झाल्यावर त्याने स्वीकृती दिल्यास त्यास तात्पुरते देकारपत्र अर्जदाराच्या Login मध्ये उपलब्ध करण्यात येईल. अनिवासी भूखंडाची संपूर्ण विक्री किंमत निश्चित वेळापत्रकानुसार [टप्प्या - टप्प्याने] भरावयाची आहे.

| टप्पा | भरावयाची रक्कम | मुदत |
|---|---|---|
| १ | अनिवासी भूखंडाच्या एकूण किंमतीच्या<br>२५ % रक्कम | तात्पुरते देकार पत्र लॉगीन मध्ये उपलब्ध करुन दिल्याच्या दिनांकापासून ४५ दिवसांच्या आत रक्कम भरावयाची आहे. |
| २ | उर्वरित ७५ % रक्कम | टप्पा १ च्या मुदतीनंतर पुढील ६० दिवसांच्या आत भरावयाची आहे. |

**टप्पा १ :** तात्पुरते देकारपत्राच्या दिनांकापासून ४५ दिवसांच्या आत अनिवासी भुखंडाची २५ % रक्कम भरणे बंधनकारक आहे. सदर प्रथम टप्प्यातील २५ % रक्कमेचा भरणा करण्याचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर (तात्पुरत्या देकारपत्राच्या दिनांकापासून ४५ दिवसानंतर) द.सा.द.शे. विहीत दराने व्याज आकारणीच्या अधीन राहून १५ दिवसांची मुदतवाढ देण्यात येईल. या कालावधीतही (तात्पुरत्या देकारपत्राच्या दिनांकापासून ६० दिवसांत) प्रथम टप्प्यातील २५ % रक्कम न भरल्यास दुकानाचे वितरण रद्द करण्यात येईल.

**टप्पा २ :** टप्पा १ च्या मुदतीनंतर पुढील ६० दिवसांत सदनिकेची उर्वरित ७५ टक्के रक्कम भरणे बंधनकारक आहे. सदर कालावधीतही लिलावधारकाने ७५% रकमेचा भरणा न केल्यास, १०५ दिवसांची विहित कालावधी संपुष्टात आल्यानंतर द.सा.द.शे. विहीत दराने व्याज आकारणीच्या अधीन राहून लिलावधारकास अधिकतम ९० दिवसांची मुदतवाढ देण्यात येईल. यानंतरही (तात्पुरत्या देकारपत्राच्या दिनांकापासून १९५ दिवसांत) दुकानाची किंमत अदा करण्यात लिलावधारकाने कसून केल्यास किंबहुना न भरल्यास तात्पुरते देकारपत्र तात्काळ रद्द करण्यात येईल तथा लिलावधारकाने भरणा केलेली संपूर्ण अनामत रक्कम जप्त (Forfeit) केली जाईल. उर्वरित रक्कम कोणतेही व्याज न देता अर्जदाराच्या बँक खात्यामध्ये जमा करण्यात येईल .

१२.१) ज्या लिलावधारकांना १००% रक्कम एकाच टप्प्यामध्ये (एकरकमी) भरावयाची आहे, असे लिलावधारक बँकेमध्ये एक रकमी म्हणजेच १००% रक्कम भरु शकतात. मात्र त्यासाठी त्यांनी संपूर्ण रकमेचा भरणा ४५ दिवसाचे आत करणे आवश्यक आहे.

१३) २५ टक्के विक्री किंमतीचा भरणा केल्यानंतर यशस्वी लिलावधारकाने मागणी केल्यास कोणत्याही वित्तिय संस्थेकडून कर्ज प्राप्त होण्यासाठी मंडळाचे "ना हरकत प्रमाणपत्र" देण्यात येईल. त्याकरिता लिलावधारकाने बँकेचे Provision Sanction Letter For Loan जोडून "ना हरकत प्रमाणपत्र" मिळणेसाठी अर्ज करणे आवश्यक आहे.

१४) रु. ५०.०० लाख आणि त्यापेक्षा जास्त विक्री किंमत असलेल्या भूखंडासाठी यशस्वी लिलावधारकांस लावल्यास १% रक्कम TDS स्वरुपात आयकर विभाग, भारत सरकार यांचेकडे भरणे बंधनकारक राहील.

१५) कोणत्याही कारणास्तव यशस्वी लिलावधारकाने अनिवासी भूखंड नाकारले किंवा कोणत्याही कारणास्तव वितरण रद्द करण्यात आल्यास लिलावधारकाने अनिवासी भूखंडाच्या किंमतीपोटी भरलेल्या अनामत रकमेचा परतावा लिलावधारकास करण्यात येणार नाही. लिलावधारकाने भरणा केलेली संपूर्ण अनामत रक्कम जप्त (Forfeit) केली जाईल.

१६) अनिवासी भूखंडांसाठी भरणा केलेल्या अनामत रकमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज दिले जाणार नाही.

१७) अनिवासी भूखंडांसमोरील मोकळ्या जागेवर कोणत्याही प्रकारचे बांधकाम व अतिक्रमण करता येणार नाही.

१८) **अनिवासी भुखंड वितरणाच्या इतर महत्त्वाच्या अटी -**

१८.१.) या माहिती पुस्तकेत दिलेला तपशील परिपूर्ण नसून, फक्त मार्गदर्शनार्थ आहे. अनिवासी भुखंडाच्या वितरणाच्या अटी व शर्ती, यशस्वी लिलावधारकांना वेळोवेळी म्हाडाद्वारे कळविल्या जातील व त्या लिलावधारकांना बंधनकारक राहतील. तसेच महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (मिळकत व्यवस्थापन, विक्री, हस्तांतरण व

सदनिकेची अदलाबदल) विनियम १९८१ / महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (जमिनीची विल्हेवाट) नियम १९८१ मधील तरतुदी तसेच वेळोवेळी होणा-या सुधारणांसह अर्जदारास जशाच्या तशा व संपूर्णपणे बंधनकारक राहतील.

१८.२) मंडळातर्फे मोकळा भुखंड वाटप करण्यात येणार आहे. महानगरपालिकेचे सर्व कर, पाणीपट्टी, मल:निस्सारण आकार, वीज आकार इत्यादी यशस्वी लिलावधारकास संबंधित स्थानिक संस्थाकडे परस्पर भरावे लागतील.

१८.३) अनिवासी भूखंडांच्या गाळ्याचा पुर्ण विक्री किंमतीचा भरणा (वर नमूद केलेल्या पध्दतीनुसार) केल्यानंतरच सदर गाळ्याचा ताबा देण्यात येईल.

१८.४) प्राधिकरणाच्या प्रचलित धोरणानुसार उच्चतम निविदाधारकास सदर अनिवासी भुखंडाचे नियमानुसार अकृषिकर,भुईभाडे व इतर कर यांचे भांडवलीकरण करुन येणारी रक्कम भुखंड ताब्यात घेण्यापुर्वी त्यांच्या ई-लिलावातील दरा व्यतिरीक्त भरणा करावी लागेल.

१८.५) सदर रक्कम भरणा केल्यानंतर देण्यात येणा-या वाटपपत्रावर यशस्वी लिलावधारकांना महाराष्ट्र शासनाच्या नियमानुसार विक्री किंमतीवर विहित मुद्रांक शुल्क भरावे लागेल. याबाबतचे कागदोपत्री पुरावे उपमुख्य अधिकारी,छत्रपती संभाजीनगर मंडळ यांना सादर करणे आवश्यक असेल त्याशिवाय अनिवासी भुखंडाचे वितरण पत्र व ताबा पत्र देण्यात येणार नाही.

१८.६) जाहिरातीत दर्शविण्यात आलेल्या विक्री किंमतीमध्ये वार्षिक सेवाशुल्क समाविष्ट नाहीत. ताबा घेण्यापूर्वी वार्षिक सेवाशुल्क लाभार्थ्यांस कळविण्यात येईल. कळविण्यात आलेल्या सेवाशुल्काची (चालू मागणी आणि प्रलंबित शुल्क) संपूर्ण रक्कम भरणे बंधनकारक आहे. सदर रक्कम भरल्यानंतरच ताबा देण्यात येईल.

१८.७) सदर अनिवासी भुखंड असलेल्या गृहनिर्माण संस्थेस इमारतीचे सेवा हस्तांतर करण्याची कार्यवाही पूर्ण झाली असेल तर सेवाशुल्काची बाब सदर गृहनिर्माण संस्थेशी संबंधित राहिल. गृहनिर्माण संस्थेच्या नियमानुसार यशस्वी लिलावधारकास सेवाशुल्काची (चालू मागणी आणि प्रलंबित शुल्क ) संपूर्ण रक्कम भरणे बंधनकारक आहे.

१८.८) शासनाच्या धोरणानुसार / अधिसुचनेनुसार मंडळाने विक्रीकरीता काढलेल्या भूखंडास विक्री किंमती व्यतिरिक्त वस्तु व सेवा कर (Goods & Service Tax) लागू झाल्यास सदर कर अथवा भविष्यात लागू होणारे इतर कर यशस्वी लिलावाधारकास परस्पर संबंधित कार्यालयात भरावे लागतील. त्यानंतरच ताबा दिला जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

१८.९) अर्जदाराने Online नोंदणी करतेवेळेस स्व:त:ची कागदपत्रे Upload करावयाची आहेत. छाननीमध्ये इतर व्यक्तीं/ठिकाण/वस्तु इत्यादींची कागदपत्रे अथवा फोटो Upload केले असल्याचे आढळून आल्यास अर्ज अवैध ठरविण्यात येईल.

१८.१०) यशस्वी लिलावाधारकाला संबंधित अनिवासी भुखंडाचा वापर त्याच प्रायोजनासाठीच करावा लागेल. संबंधित भुखंडावर म्हाडाने/स्थानिक स्वराज्य संस्थेने लागु केलेले व्यवसायासंबंधी जे नियम असतील त्याप्रमाणे व्यवसाय करणे बंधनकारक असेल. आजूबाजूच्या रहिवाश्यांना त्रास होईल/आक्षेप असेल असा कोणताही व्यवसाय करता येणार नाही.

१८.११) वितरीत केलेल्या अनिवासी भुखंडामध्ये कोणत्याही प्रकारचे बदल अथवा जादाचे बांधकाम मुख्य अधिकारी / छत्रपती संभाजीनगर मंडळ यांचे परवानगीशिवाय करता येणार नाही.

१८.१२) कोणत्याही प्रकारे भौतिकदृष्ट्या हानी होईल अशा प्रकारे वापर करु नये.

१८.१३) यशस्वी लिलावाधारकाला संबंधित अनिवासी भुखंडावर म्हाडाने/स्थानिक स्वराज्य संस्थेने लागु केलेले व्यवसायासंबंधी जे नियम असतील त्याप्रमाणे व्यवसाय करणे बंधनकारक असेल. यशस्वी गाळेधारकांस जो व्यवसाय भुखंडावर सुरु करावयाचा आहे त्यासाठी लागणाऱ्या परवानगी / परवाना मंजूरी इत्यादी बाबी स्वत: कराव्या लागतील. आवश्यक ते परवाने, मंजुरी अथवा परवानगी न मिळाल्यास त्यातून उदभवणारी कोणत्याही

प्रकारची आर्थिक वा इतर दायित्वे यासाठी मंडळास जबाबदार धरता येणार नाही.

१८.१४) वितरण करण्यात आलेल्या अनिवासी भूखंडांच्या भूखंडधारकांनी पहिला गाळा वितरीत झाल्यापासून ९० दिवसांच्या आत सहकारी संस्था स्थापन करावयाची आहे. (जर यापूर्वी सहकारी संस्था नोंदणी झालेली नसल्यास) अनिवासी भूखंडांच्या मालकी हक्काचे हस्तांतरण अशा पंजीकृत सहकारी संस्थेस करण्यात येईल. महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण अशा स्थापन झालेल्या संस्थेस संकुलाची नियमानुसार देय जागा विहित मुदतीसाठी भाडेपट्ट्याने देईल. सदरचा भाडेपट्टा नियमानुसार ५ वर्षांचा असेल. या भाडेपट्ट्याच्या अटी - शर्ती व नियम मुख्य अधिकारी, छत्रपती संभाजीनगर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ यांचेकडून ठरविण्यात येतील.शासनाला जे कर भरणे बंधनकारक आहेत असे सर्व कर यशस्वी अर्जदारास भरणे बंधनकारक राहतील.

**१९. लिलावधारकाने देऊ केलेल्या रकमेमध्ये खालील बाबी समाविष्ट नसतील.**

- महानगरपालिका कर
- विम्याचा हप्ता
- कागदपत्रांसाठी लागणारे कायदेशीर शुल्क
- भाडेपट्टा
- मंडळाकडे भरावयाच्या तीन महिन्यांचे सेवा शुल्क
- सहकारी संस्थेसाठी लागणारे नोंदणी किंवा तत्सम शुल्क
- महाराष्ट्र शासनास भरण्यात येणारे मुद्रांक शुल्क
- विद्युतमापकासाठीचे अनामत रक्कम, परवाना शुल्क इ.

वरील सर्व शुल्क हे लिलावधारकाने स्वत: वेगळे भरावयाचे आहेत. त्याबाबतची त्यांची वेगळी जबाबदारी असेल.

२०. सदरची अनिवासी भुखंड "जशी आहेत व जेथे आहेत तशा स्वरुपात" या तत्त्वावर विकण्यात येणार आहेत. लिलावधारकाने ई-लिलाव प्रक्रीयेत भाग घेण्यापूर्वी प्रत्यक्ष जागेवर भुखंडाची पाहणी करुन बोली लावणे आवश्यक / अपेक्षित आहे. तद्पश्चात सद्यस्थितीवरुन बोली रद्द करणेबाबत अर्ज प्राप्त झाल्यास असे अर्ज ग्राह्य धरण्यात येणार नाहीत. तथा अशा लिलावधारकांची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

२१. माहिती पुस्तिका मराठी भाषांमध्ये तयार केलेली आहे. असे करीत असताना माहिती पुस्तिकेत विसंगती आढळल्यास लिलावधारकास त्याचा फायदा घेता येणार नाही.

२२. अर्जदाराने संकेतस्थळावरील व माहितीपुस्तिकेतील सर्व अटी व शर्ती काळजीपुर्वक वाचूनच अर्ज सादर करावा.

**मुख्य अधिकारी,छत्रपती संभाजीनगर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ यांनी कोणतेही कारण न देता, या ई-लिलावासाठी येणारे अर्ज स्विकारणे वा नाकारणे किंवा जाहिरात देतांना काही चुक झाल्यास त्या दुरुस्तीबाबतचे तसेच सर्व योजना किंवा एखादी विशिष्ट योजना रद्द करण्याचे तसेच या ई-लिलावासंबंधीत संपुर्ण अधिकार राखून ठेवले आहेत. मुख्य अधिकारी यांनी घेतलेला निर्णय सर्वांना बंधनकारक असेल.**

**स्वाक्षरीत**
**(शिवकुमार आवळकंठे)**
**मुख्य अधिकारी**
**छत्रपती संभाजीनगर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**छत्रपती संभाजीनगर.**

# ठळक बाबी

- ई-लिलावामध्ये ज्या अनिवासी भुखंडाचा समावेश करण्यात आलेला आहे त्याबाबतचा संपुर्ण तपशील मराठी व इंग्रजी भाषेत खालील नमुद तक्त्यामध्ये देण्यात आलेला आहे.
- अर्जदारांनी अर्ज करावयाच्या अनिवासी भुखंडाची संपुर्ण माहिती व्यवस्थित वाचून घ्यावी. तसेच योजनेचे ठिकाण तसेच प्रत्यक्ष जायमोक्यावर याबाबत व्यवस्थित माहिती घेवून अर्जाचा भरणा करावा.
- ई-लिलावाची प्रक्रिया पार पडल्यानंतर अर्जदारांचे याबाबत म्हणणे ऐकून घेतले जाणार नाही. याची नोंद घ्यावी.
- ई-लिलावाच्या अंतिम बोलीकरिता दि.04/07/2025 रोजी दुपारी 5.00 वाजेपर्यंत वेळ देण्यात आलेली आहे. परंतु सदर ई-लिलाव ऑनलाईन पध्दतीने असल्याने जो अर्जदार वेळ समाप्तीच्या वेळेस अंतिम बोली लावेल त्यानंतर 10 मिनिटाचा वाढीव वेळ असणार आहे. याची नोंद घ्यावी.
- ई-लिलावासंबंधित सर्व अधिकार मा.मुख्य अधिकारी/छत्रपती संभाजीनगर मंडळ यांनी राखून ठेवलेले आहेत.

| लिलाव पध्दतीने व्यायसायिक/ सुविधा भूंखड जुन-२०२५ | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| छत्रपती संभाजीनगर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, छत्रपती संभाजीनगर (म्हाडा विभागीय घटक) | | | | | | | | |
| व्यावसायिक व सुविधा भूखंड (अनिवासी वापर) | | | | | | | | |
| अनु क्र. | जिल्हा | वसाहतीचे नाव व ठिकाण | भुखंडाचा अनुज्ञेय वापर | भुखंडाचे क्षेत्रफळ अंदाजित चौ.मी. | भुखंडाचा प्रति चौ.मी.दर | विक्री किंमत(बेस प्राईस) | अक्षांश | रेखांक्ष |
| १ | छत्रपती संभाजीनगर | मुर्तिजापूर, छत्रपती संभाजीनगर | सोयीची दुकाने सी-३ | २७०.०० | ८३३८०.०० | २२५१२६०० | १९.८६६१५४ | ७५.३९००२५ |
| २ | छत्रपती संभाजीनगर | गट क्र.१४५, देवळाई, छत्रपती संभाजीनगर | दवाखाना | ९८२.९८ | ११०००.०० | १०८१२७८० | १९.८३११५१ | ७५.३४७४३० |
| ३ | छत्रपती संभाजीनगर | गट क्र.१४५, देवळाई, छत्रपती संभाजीनगर | सोयीचे दुकाने | ३७६.४५ | २२०००.०० | ८२८१९०० | १९.८३१२१४ | ७५.३४७४०६ |
| ४ | छत्रपती संभाजीनगर | गट क्र.१४५, देवळाई, छत्रपती संभाजीनगर | सोयीचे दुकाने | ३६५.५५ | २२०००.०० | ८०४२१०० | १९.८३११३९ | ७५.३४७४१६ |
| ५ | छत्रपती संभाजीनगर | सर्व्हे क्र.३० व ३१, कन्नड, छत्रपती संभाजीनगर | दवाखाना | २९७.०० | २६८७०.०० | ७९८०३०० | २०.२७५३०९ | ७५.१३५०१६ |
| ६ | छत्रपती संभाजीनगर | सर्व्हे क्र.३० व ३१, कन्नड, छत्रपती संभाजीनगर | व्यापारी दुकान | ४७२.०० | २६८७०.०० | १२६८२४९८ | २०.२७५४३६ | ७५.१३४९६७ |
| ७ | छत्रपती संभाजीनगर | सर्व्हे क्र.३० व ३१, कन्नड, छत्रपती संभाजीनगर | सुविधा भूखंड | ३९९.०० | २६८७०.०० | १०७२१०१० | २०.२७५४१३ | ७५.१३५२०८ |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ | छत्रपती संभाजीनगर | सर्व्हे क्र.३० व ३१, कन्नड, छत्रपती संभाजीनगर | व्यापारी भूखंड | ५००.०० | २६८७०.०० | १३४३४८५० | २०.२७५३१३ | ७५.१३४५५२ |
| ९ | छत्रपती संभाजीनगर | सर्व्हे क्र १०४, तिसगांव, छत्रपती संभाजीनगर | पोस्ट ऑफीस, शॉपी, नर्सरी, डिस्पेन्सरी | ३८६९.७७ | १८७४३.०० | ७२५३०७१२ | १९.८५३६८१ | ७५.२६९०३३ |
| १० | छत्रपती संभाजीनगर | स क्र २१५ हर्सुल | वाणिज्य दुकाने | ३००.०० | १७१६०.०० | ५१४८००० | १९.९२२६५८ | ७५.३४५५१९ |
| ११ | जालना जिल्हा | स क्र ५४ भोकरदन जि जालना | प्राथमिक शाळा भुखंड-आय (I) | १२९४.०६ | ७६२७.०० | ९८७०३१३ | २०.२५०७८१ | ७५.७६४३२४ |
| १२ | जालना जिल्हा | सर्व्हे क्र.५४, भोकरदन, जि. जालना | व्यापारी भूखंड-ए | ९६३.०० | ७६२७.०० | ७३४५१८६ | २०.२५०६९५ | ७५.७६३९६३ |
| १३ | जालना जिल्हा | सर्व्हे क्र.५४, भोकरदन, जि. जालना | व्यापारी भूखंड-सी | ८४३.१६ | ७६२७.०० | ६४३१११९ | २०.२५०५०५ | ७५.७६४०१७ |
| १४ | जालना जिल्हा | सर्व्हे क्र.५४, भोकरदन, जि. जालना | सुविधा भूखंड-ई | ६२५.९१ | ७६२७.०० | ४७७४०६६ | २०.२५०६५९ | ७५.७६४३४७ |
| १५ | जालना जिल्हा | सर्व्हे क्र.५४, भोकरदन, जि. जालना | सुविधा भूखंड-एफ | ७२८.५० | ७६२७.०० | ५५५६५६१ | २०.२५०८१२ | ७५.७६३८९३ |
| १६ | जालना जिल्हा | सर्व्हे क्र.५४, भोकरदन, जि. जालना | दवाखाना भुखंड-एच | ६८९.५७ | ७६२७.०० | ५२५९६२६ | २०.२५०६८९ | ७५.७६४४६८ |
| १७ | जालना जिल्हा | स क्र ४३०(P) & ४३१(P), जालना | सुविधा भूखंड-A | ५००.०० | २१०००.०० | १०५००००० | १९.५००३९० | ७५.५३१९४० |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १८ | जालना जिल्हा | सर्व्हे क्र.१५६, टोकवाडी, ता.मंठा, जि. जालना | कन्व्हिनियंट शॉपिंग-C | ६२४.२६ | ३९४६.०० | २४६३१४३ | १९.६५५६३५ | ७६.४००८९ |
| १९ | जालना जिल्हा | सर्व्हे क्र.१५६, टोकवाडी, ता.मंठा, जि. जालना | सुविधा भूखंड-A | ५६२.७७ | ३९४६.०० | २२२०५२१ | १९.६५५६३५ | ७६.४००९४७ |
| २० | धाराशिव जिल्हा | सर्व्हे क्र.२३६/२/२, नळदुर्ग, ता. तुळजापूर, जि. धाराशिव | व्यापारी भूखंड AP-१ | ५९८.८६ | १२७३९.०० | ७६२८९३७ | १७.८१६१९ | ७६.२६९८१६ |
| २१ | धाराशिव जिल्हा | सर्व्हे क्र.२३६/२/२, नळदुर्ग, ता. तुळजापूर, जि. धाराशिव | दवाखाना AP-२ | २९८.२८ | ५९०५.०० | १७६१२८४ | १७.८१६१९ | ७६.२६९८१६ |
| २२ | नांदेड जिल्हा | गट क्र ४५५ मुदखेड नांदेड | सुविधा भूखंड | १०५६.८८ | ५५३७.०० | ५८५२३६७ | १९.१५३४९४ | ७७.५१३५५२ |
| २३ | नांदेड जिल्हा | गट क्र ४५५ मुदखेड नांदेड | सुविधा भूखंड | ६५८.१२ | ५५३७.०० | ३६४४२७४ | १९.१५३४९६ | ७७.५१२१४९ |
| २४ | नांदेड जिल्हा | गट क्र ४५५ मुदखेड नांदेड | प्राथमिक शाळा | १३१९.५० | ३०५४.०० | ४०२९२२५ | १९.१५३३५४ | ७७.५१३२३२ |
| २५ | नांदेड जिल्हा | गट क्र ४५५ मुदखेड नांदेड | सोयीचे दुकाने | ५२०.०० | ५५३७.०० | २८७९४४८ | १९.१५३६९२ | ७७.५१२२३५ |
| २६ | नांदेड जिल्हा | सर्व्हे क्र.३ व ४, म्हाळजा, जि. नांदेड | सुविधा भूखंड P-३ | ३५२.०० | ६६००.०० | २३२३२०० | १९.१७६१७३ | ७७.३४२६६२ |
| २७ | नांदेड जिल्हा | सर्व्हे क्र.३ व ४, म्हाळजा, जि. नांदेड | सुविधा भूखंड P-४ | ४३३.०० | ६६००.०० | २८५७८०० | १९.१७६१७३ | ७७.३४२६६२ |
| २८ | नांदेड जिल्हा | गट क्र.५८, सहयोग नगर, नांदेड | बालवाडी | २६८.०० | २०९००.०० | ५६०१२०० | १९.१८३१७६ | ७७.३०६४२६ |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २९ | नांदेड जिल्हा | गट क्र.५८, सहयोग नगर, नांदेड | सुविधा भूखंड AP-१ | ३५१.५० | ४१८००.०० | १४६९२७०० | १९.१८२६४९ | ७७.३०७६६६ |
| ३० | नांदेड जिल्हा | गट क्र.६७९, अर्धापूर, जि.नांदेड | व्यापारी भूखंड | ३५७.०० | १०४२०.०० | ३७२००४७ | १९.२७५६१२ | ७७.३६७६२४ |
| ३१ | लातूर जिल्हा | स क्र ९७, ९८ बाभूळगांव रोड लातूर | सुविधा भूखंड | १२१८.०० | १५२४८.०० | १८५७२३०८ | १८.३९७५८८ | ७६.६०४३६५ |
| ३२ | लातूर जिल्हा | स क्र ९७, ९८ बाभूळगांव रोड लातूर | सुविधा भूखंड | ९७५.२५ | १५२४८.०० | १४८७०८०७ | १८.३९४५५५ | ७६.६०६१९६ |
| ३३ | लातूर जिल्हा | स क्र ९७, ९८ बाभूळगांव रोड लातूर | प्राथमिक शाळा | १०००.०० | ६३२३.०० | ६३२२८०० | १८.३९६०२२ | ७६.६०४३२८ |
| ३४ | लातूर जिल्हा | स क्र १६४ उद्गीर | (Future) शॉपिंग भूखंड | ९९०.०० | २५७४.०० | २५४८२६० | १८.४०७४३३ | ७७.१२६९९८ |
| ३५ | लातूर जिल्हा | स क्र १६४ उद्गीर | सुविधा दुकाने | ४९३.०० | २५७४.०० | १२६८९८२ | १८.४०६५७४ | ७७.१२७०३१ |
| ३६ | परभणी जिल्हा | स क्र १६३ (भाग) बोरी | व्यापारी भूखंड | ३३०.०० | ३८५०.०० | १२७०५०० | १९.४८९२०१ | ७६.७३७८५९ |
| ३७ | परभणी जिल्हा | स क्र १६३ (भाग) बोरी | व्यापारी भूखंड | ३१५.०० | ३८५०.०० | १२१२७५० | १९.४८९१८३ | ७६.७३७३४६ |
| ३८ | परभणी जिल्हा | सर्व्हे क्र.५२७, परभणी | सुविधा भूखंड-A | ४५२.६० | १४७४०.०० | ६६७१३२४ | १९.२५६५३८ | ७६.७५६७४७ |
| ३९ | परभणी जिल्हा | सर्व्हे क्र.५२७, परभणी | व्यापारी भूखंड-सी-१ | ३९०.०० | १४७४०.०० | ५७४८६०० | १९.२५४१५४ | ७६.७५५९१८ |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४० | परभणी जिल्हा | सर्व्हे क्र.५२७, परभणी | व्यापारी भूखंड-सी-२ | ३३०.०० | १४७४०.०० | ४८६४२०० | १९.२५४१५४ | ७६.७५५९१८ |
| ४१ | परभणी जिल्हा | सर्व्हे क्र.५२७, परभणी | व्यापारी भूखंड-सी-३ | ५०१.०० | १४७४०.०० | ७३८४७४० | १९.२५४१५४ | ७६.७५५९१८ |
| ४२ | परभणी जिल्हा | सर्व्हे क्र.५२७, परभणी | व्यापारी भूखंड-सी-४ | ४०२.५० | १४७४०.०० | ५९३२८५० | १९.२५४१५४ | ७६.७५५९१८ |
| ४३ | छत्रपती संभाजीनगर | गट क्र.०९,नक्षत्रवाडी, छ. संभाजीनगर | सुविधा भूखंड | ५८४.०० | १६६८४.०० | ९७४३२८१ | १९.८२१६०० | ७५.२९६३६८ |
| ४४ | छत्रपती संभाजीनगर | गट क्र.७४, देवळाई, छ. संभाजीनगर | वाणिज्य + सुविधा भूखंड-१ | १७७४.०४ | २०१४१.०० | ३५७३०९४० | १९.८३२६७९ | ७५.३४९४०१ |
| ४५ | छत्रपती संभाजीनगर | गट क्र.७४, देवळाई, छ. संभाजीनगर | सुविधा भूखंड-३ | १८८३.६९ | १९३३३.०० | ३६४१७३७९ | १९.८३२७२३ | ७५.३४७३४६ |
| ४६ | छत्रपती संभाजीनगर | गट क्र.७४, देवळाई, छ. संभाजीनगर | वाणिज्य + सुविधा भूखंड-५ | १६२४.०९ | २०१४१.०० | ३२७१०७९७ | १९.८३४७३६ | ७५.३४९९१८ |
| ४७ | छत्रपती संभाजीनगर | गट क्र.७४, देवळाई, छ. संभाजीनगर | वाणिज्य + सुविधा भूखंड-४ | ७२२.७० | २०१४१.०० | १४५५५९०१ | १९.८३४८८४ | ७५.३४९४३६ |
| ४८ | छत्रपती संभाजीनगर | गट क्र.७४, देवळाई, छ. संभाजीनगर | प्राथमिक शाळा / हायस्कुल-२ | ४६१०.१४ | १८०२९.०० | ८३११६२१४ | १९.८३२६५६ | ७५.३४८८०३ |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४९ | छत्रपती संभाजीनगर | सर्व्हे क्र.७/१&७/२,मुकूंदवाडी छ. संभाजीनगर | R (रहिवासी) + C (अनिवासी) भूखंड (P-५) | ३९४.०६५ | ८३३८०.०० | ३२८५७१४० | १९.८७०८६९ | ७५.३८८४६२ |
| ५० | छत्रपती संभाजीनगर | सर्व्हे क्र १०४, तिसगांव, छ.संभाजीनगर | म्हाडा प्लॉट क्र.२ (रहिवासी भूखंड) | ६८३.९८ | ८९७१.०० | ६१३५६४३ | १९.८५३६८१ | ७५.२६९०३३ |
| ५१ | छत्रपती संभाजीनगर | सर्व्हे क्र १०४, तिसगांव, छ. संभाजीनगर | म्हाडा प्लॉट क्र.१ (रहिवासी भूखंड) | ३०९.९२ | ८९७१.०० | २७८०१३७ | १९.८५३६८१ | ७५.२६९०३३ |
| ५२ | जालना जिल्हा | सर्व्हे क्र.५४, भोकरदन, जि. जालना | व्यापारी भूखंड-डी | ७७२.२८ | ७६२७.०० | ५८९०४८८ | २०.२४९२५६ | ७५.७६१८३९ |
| ५३ | परभणी जिल्हा | सर्व्हे क्र.११ ,देवसडी, परभणी | मोठया जमिनीचा भूखंड (Bulk Land) | ३९००.०० | ८८.०० | ३४३२०० | १९.५३९८३८ | ७६.८७२३८१ |

## COMMERCIAL/ AMENITY PLOT E-AUCTION JUNE-2025
## CHHATRAPATI SAMBHAJINAGAR HOUSING & AREA DEVELOPMENT BOARD
## COMMERCIAL/AMENITY PLOT DETAILS

| Sr. No. | District | Scheme Name & Location | Use of Plot | Area (Sq. Mtr.) | Per Sq. Mtr. Rate | (Base Price) | Lattitude | Longitude |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 1 | Chhatrapati Sambhajinagar | Murtizapur, Chhatrapati Sambhajinagar | Convenient Shopping - C-3 | 270.00 | 83380.00 | 22512600 | 19.866154 | 75.390025 |
| 2 | Chhatrapati Sambhajinagar | Gut No.145, Deolai, Chhatrapati Sambhajinagar | Diespensary | 982.98 | 11000.00 | 10812780 | 19.831151 | 75.347430 |
| 3 | Chhatrapati Sambhajinagar | Gut No.145, Deolai, Chhatrapati Sambhajinagar | Convenient Shopping | 376.45 | 22000.00 | 8281900 | 19.831214 | 75.347406 |
| 4 | Chhatrapati Sambhajinagar | Gut No.145, Deolai, Chhatrapati Sambhajinagar | Convenient Shopping | 365.55 | 22000.00 | 8042100 | 19.831139 | 75.347416 |
| 5 | Chhatrapati Sambhajinagar | Survey No.30 & 31, Kannad, Chhatrapati Sambhajinagar | Diespensary | 297.00 | 26870.00 | 7980300 | 20.275309 | 75.135016 |
| 6 | Chhatrapati Sambhajinagar | Survey No.30 & 31, Kannad, Chhatrapati Sambhajinagar | Commercial Plot | 472.00 | 26870.00 | 12682498 | 20.275436 | 75.134967 |
| 7 | Chhatrapati Sambhajinagar | Survey No.30 & 31, Kannad, Chhatrapati Sambhajinagar | Amenity Plot | 399.00 | 26870.00 | 10721010 | 20.275413 | 75.135208 |
| 8 | Chhatrapati Sambhajinagar | Survey No.30 & 31, Kannad, Chhatrapati Sambhajinagar | Commercial Plot | 500.00 | 26870.00 | 13434850 | 20.275313 | 75.134552 |
| 9 | Chhatrapati Sambhajinagar | Survey No.104, Tisgaon, Chhatrapati Sambhajinagar | Post Office Shopee, Nursary, Dispensary | 3869.77 | 18743.00 | 72530712 | 19.853681 | 75.269033 |
| 10 | Chhatrapati Sambhajinagar | S.No.215, Harsul | Commercial | 300.00 | 17160.00 | 5148000 | 19.922658 | 75.345519 |
| 11 | Jalna | S.No.54, Bhokardan | Primary School Plot-I | 1294.06 | 7627.00 | 9870313 | 20.250781 | 75.764324 |
| 12 | Jalna | S.No.54, Bhokardan | Commercial Plot-A | 963.00 | 7627.00 | 7345186 | 20.250695 | 75.763963 |
| 13 | Jalna | S.No.54, Bhokardan | Commercial Plot-C | 843.16 | 7627.00 | 6431119 | 20.250505 | 75.764017 |
| 14 | Jalna | S.No.54, Bhokardan | Amenity Plot-E | 625.91 | 7627.00 | 4774066 | 20.250659 | 75.764347 |
| 15 | Jalna | S.No.54, Bhokardan | Amenity Plot-F | 728.50 | 7627.00 | 5556561 | 20.250812 | 75.763893 |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 16 | Jalna | S.No.54, Bhokardan | Diespensary Plot-H | 689.57 | 7627.00 | 5259626 | 20.250689 | 75.764468 |
| 17 | Jalna | S.No.430 (P), 431 (P), Jalna | Amenity Plot-A | 500.00 | 21000.00 | 10500000 | 19.500390 | 75.531940 |
| 18 | Jalna | Survey No.156, Tokwadi, Mantha | Convenient Shopping-C | 624.26 | 3946.00 | 2463143 | 19.655635 | 76.40089 |
| 19 | Jalna | Survey No.156, Tokwadi, Mantha | Amenity Plot-A | 562.77 | 3946.00 | 2220521 | 19.655635 | 76.400947 |
| 20 | Dharashiv | Survey No.236/2/2, Naldurg, Tuljapur, Dharashiv | Commercial Plot AP-1 | 598.86 | 12739.00 | 7628937 | 17.81619 | 76.269816 |
| 21 | Dharashiv | Survey No.236/2/2, Naldurg, Tuljapur, Dharashiv | Diespensary AP-2 | 298.28 | 5905.00 | 1761284 | 17.81619 | 76.269816 |
| 22 | Nanded | Gut No.455, Mudkhed, Nanded | Amenity Plot | 1056.88 | 5537.00 | 5852367 | 19.153494 | 77.513552 |
| 23 | Nanded | Gut No.455, Mudkhed, Nanded | Amenity Plot | 658.12 | 5537.00 | 3644274 | 19.153496 | 77.512149 |
| 24 | Nanded | Gut No.455, Mudkhed, Nanded | Primary School | 1319.50 | 3054.00 | 4029225 | 19.153354 | 77.513232 |
| 25 | Nanded | Gut No.455, Mudkhed, Nanded | Convenient Shopping | 520.00 | 5537.00 | 2879448 | 19.153692 | 77.512235 |
| 26 | Nanded | Survey No.3 & 4, Mhalja, Nanded | Amenity Plot P-3 | 352.00 | 6600.00 | 2323200 | 19.176173 | 77.342662 |
| 27 | Nanded | Survey No.3 & 4, Mhalja, Nanded | Amenity Plot P-4 | 433.00 | 6600.00 | 2857800 | 19.176173 | 77.342662 |
| 28 | Nanded | Gut No.58, Sahyog Nagar, Nanded | Balwadi | 268.00 | 20900.00 | 5601200 | 19.183176 | 77.306426 |
| 29 | Nanded | Gut No.58, Sahyog Nagar, Nanded | Amenity Plot AP-1 | 351.50 | 41800.00 | 14692700 | 19.182649 | 77.307666 |
| 30 | Nanded | Gut No.679, Ardhapur, Nanded | Commericial Plot | 357.00 | 10420.00 | 3720047 | 19.275612 | 77.367624 |
| 31 | Latur | S.No.97, 98, Babhulgaon Road, Latur | Amenity Plot | 1218.00 | 15248.00 | 18572308 | 18.397588 | 76.604365 |
| 32 | Latur | S.No.97, 98, Babhulgaon Road, Latur | Amenity Plot | 975.25 | 15248.00 | 14870807 | 18.394555 | 76.606196 |
| 33 | Latur | S.No.97, 98, Babhulgaon Road, Latur | Primary School | 1000.00 | 6323.00 | 6322800 | 18.396022 | 76.604328 |
| 34 | Latur | S.No.164 Udgir | Amenity Plot | 990.00 | 2574.00 | 2548260 | 18.407433 | 77.126998 |
| 35 | Latur | S.No.164 Udgir | Amenity Plot | 493.00 | 2574.00 | 1268982 | 18.406574 | 77.127031 |
| 36 | Parbhani | S.No.163 (P), Bori | Commercial Plot | 330.00 | 3850.00 | 1270500 | 19.489201 | 76.737859 |
| 37 | Parbhani | S.No.163 (P), Bori | Commercial Plot | 315.00 | 3850.00 | 1212750 | 19.489183 | 76.737346 |
| 38 | Parbhani | S.No.527, Parbhani | Amenity Plot-A | 452.60 | 14740.00 | 6671324 | 19.256538 | 76.756747 |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 39 | Parbhani | S.No.527, Parbhani | Commercial Plot C-1 | 390.00 | 14740.00 | 5748600 | 19.254154 | 76.755918 |
| 40 | Parbhani | S.No.527, Parbhani | Commercial Plot C-2 | 330.00 | 14740.00 | 4864200 | 19.254154 | 76.755918 |
| 41 | Parbhani | S.No.527, Parbhani | Commercial Plot C-3 | 501.00 | 14740.00 | 7384740 | 19.254154 | 76.755918 |
| 42 | Parbhani | S.No.527, Parbhani | Commercial Plot C-4 | 402.50 | 14740.00 | 5932850 | 19.254154 | 76.755918 |
| 43 | Chhatrapati Sambhajinagar | Gut No.9 (P), Nakshatrawadi, Chhatrapati Sambhajinagar | Amenity Plot | 584.00 | 16684.00 | 9743281 | 19.821600 | 75.296368 |
| 44 | Chhatrapati Sambhajinagar | Gut No.74 (P), Deolai, Chhatrapati Sambhajinagar | Commercial + Amenity Plot-1 | 1774.04 | 20141.00 | 35730940 | 19.832679 | 75.349401 |
| 45 | Chhatrapati Sambhajinagar | Gut No.74 (P), Deolai, Chhatrapati Sambhajinagar | Amenity Plot-3 | 1883.69 | 19333.00 | 36417379 | 19.832723 | 75.347346 |
| 46 | Chhatrapati Sambhajinagar | Gut No.74 (P), Deolai, Chhatrapati Sambhajinagar | Commercial + Amenity Plot-5 | 1624.09 | 20141.00 | 32710797 | 19.834736 | 75.349918 |
| 47 | Chhatrapati Sambhajinagar | Gut No.74 (P), Deolai, Chhatrapati Sambhajinagar | Commercial + Amenity Plot-4 | 722.70 | 20141.00 | 14555901 | 19.834884 | 75.349436 |
| 48 | Chhatrapati Sambhajinagar | Gut No.74 (P), Deolai, Chhatrapati Sambhajinagar | Primary School/High School-2 | 4610.14 | 18029.00 | 83116214 | 19.832656 | 75.348803 |
| 49 | Chhatrapati Sambhajinagar | Survey No.7/1 & 7/2, Mukundwadi, Chhatrapati Sambhajinagar | R (residential) + C (commercial) Plot (P-5) | 394.065 | 83380.00 | 32857140 | 19.870869 | 75.388462 |
| 50 | Chhatrapati Sambhajinagar | Survey No.104, Tisgaon, Chhatrapati Sambhajinagar | Mhada Plot No.2 (Residential Plot) | 683.98 | 8971.00 | 6135643 | 19.853681 | 75.269033 |
| 51 | Chhatrapati Sambhajinagar | Survey No.104, Tisgaon, Chhatrapati Sambhajinagar | Mhada Plot No.1 (Residential Plot) | 309.92 | 8971.00 | 2780137 | 19.853681 | 75.269033 |
| 52 | Jalna | Survey No.54, Bhokardan, Chhatrapati Sambhajinagar | Commercial Plot - D | 772.28 | 7627.00 | 5890488 | 20.249256 | 75.761839 |
| 53 | Parbhani | Survey No.11, Deosadi, Parbhani | Bulk Land Plot | 3900.00 | 88.00 | 343200 | 19.539838 | 76.872381 |

छत्रपती संभाजीनगर मंडळ आपले आभारी आहे.

"धन्यवाद"